स्थापना दि.13-09-1957

# धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

## मुख्य कार्यालय,गरुडबाग, धुळे

फोन नं.(पी.बी.एक्स.) 02562-288350,288351,288352,288353 मुख्य कार्यकारी अधिकारी 02562-288350

फॅक्स 02562-288383 ई-मेल adm@dndccbank.co.in

जा.क्र. 70/प्रशासन /सरळसेवा नोकर भरती / /2026-27 धुळे दि.

प्रति,

श्री./श्रीमती : ____________

अर्ज क्रमांक : ____________

बैठक क्रमांक : ____________

अर्ज केलेले पद : ____________

ई-मेल आय.डी. : ____________

मोबाईल नंबर : ____________

नमुना

विषय : बँकेच्या सरळसेवा नोकरभरती प्रक्रियेत Clerk (लिपिक) व तांत्रिक (Technical Post) या पदासाठी कागदपत्र पडताळणी आणि मुलाखती बाबत.

बँकेच्या सरळसेवा नोकरभरती प्रक्रियेत दि.15-06-2026 व 16-06-2026 रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेत आपण पात्र ठरलेले आहात. त्यानुसार आपण Clerk (लिपिक) व तांत्रिक (Technical Post) पदासाठी नोकरी मिळण्या बाबत ऑनलाइन अर्ज केलेला आहे.या पदाच्या भरतीसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेतील पात्र केलेल्या गुणांनुसार आपल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी खालील वेळेत व नमूद ठिकाणी उपस्थित राहावे.

| कागदपत्र / प्रमाणपत्र तपासणीचे ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे मुख्य कार्यालय,गरुडबाग,धुळे | दि.07/09/2026, दि 08/9/26 व दि-09/09/2026 रोजी मुलाखत व कागदपत्रांची पडताळणी होणार आहे. बँकेमार्फत पात्र उमेदवारांची यादी दि.18-08-2026 रोजी बँकेच्या वेबसाईटवर Participent ID सह प्रसिध्द करण्यात आली आहे. | सकाळी 9.00 वाजता |

उपरोक्त वेळेनंतर तुम्ही हजर झाल्यास,तुमची कागदपत्रे तपासली जाणार नाहीत.

कागदपत्र पडताळणी व मुलाखती संदर्भात उमेदवारांकरीता महत्वाच्या सुचना

1) उमेदवाराने कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठी येताना ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत सोबत घेवून येणे अनिवार्य आहे.
2) उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी व मुलाखतीकरीता येतांना सदर पत्र सोबत आणावयाचे आहे.
3) उमेदवाराने ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे त्यास लेखी परिक्षेत बसण्याची संधी देण्यात आलेली होती. जाहिरातीतील नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसार उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीची पूर्तता करणारी मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. या तपासणी वेळी उमेदवार अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास,सदर उमेदवाराचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.
4) मुलाखतीस येतांना उमेदवाराने त्याचे मुळ प्रमाणपत्र व त्याच्या प्रत्येकी दोन छायांकित प्रती सोबत आणावीत.मुळ प्रमाणपत्र ऐवजी झेरॉक्स प्रती कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत व अशा परिस्थितीत संबधित मुळ कागदपत्रे हजर केली नसल्यास अशा उमेदवारांना मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.
5) जन्म तारीख / वयाच्या पुराव्यासाठी उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणतेही पुरावे ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
6) प्रमाणपत्र /गुणपत्रक ऐवजी इतर कोणतेही पत्र ज्ञापन अन्य पुरावा स्विकारला जाणार नाही. (तसेच उमेदवाराने एस.एस.सी.,एच.एस.सी. व इतर उच्च शैक्षिणक अर्हतेचे गुणपत्रक प्रमाणपत्र सोबत घेऊन यावीत) कोणतेही आवश्यक मुळ प्रमाणपत्र उमेदवार सादर करू शकत नसेल तर त्याकरीता उमेदवारास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.ऑनलाईन अर्जात नमुद केलेली माहिती व कागदपत्र / प्रमाणपत्र यात तफावत / त्रुटी किंवा खोटी माहिती आढळल्यास भरती प्रक्रीयेत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
7) सर्व कागदपत्र उमेदवारांच्या स्वत:च्या नावाने असणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहानंतर नावात बदल केला असल्यास, नावातील बदलाचा पुरावा दर्शक शासन राजपत्राची मुळ प्रत किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
8) जाहिरातीत नमुद बँकेतील कामकाजाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या सही शिक्क्यांनीशी अनुभवाचा दाखला कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.
9) MSCIT किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र (संगणक पदवी असल्यास अट शिथील)
10) GDC&A, HDCM, DCBM शासकीय टंकलेखन परिक्षा,शासकीय स्टेनोग्राफर उत्तीर्ण (असल्यास) गुणपत्र व प्रमाणपत्र.
11) Domicile (अधिवास/रहिवास) प्रमाणपत्र.
12) उमेदवारांची मुलाखत 5 गुणांची घेतली जाईल.शैक्षणिक पात्रता,अनुभव व इतर नैपुण्य याकरीता उमेदवारांना विस्तृत जाहिरातीत नमुद केलेल्या पध्दतीने 5 गुण देण्यात येतील असे एकूण 10 गुण असतील.
13) शैक्षणिक कागदपत्रांच्या व्यतिरिक्त उमेदवाराने आधारकार्ड व पॅनकार्डची मुळ व 2 छायांकित प्रती व 2 पासपोर्ट साईज अद्यावत कलर फोटो सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.
14) कागदपत्र पडताळणी / मुलाखतीकरीता उमेदवार अनुपस्थित राहिल्यास भरती प्रक्रीयेच्या पुढील टप्प्याकरीता अशा उमेदवारांचा विचार करण्यात येणार नाही.
15) उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी व मुलाखतीसाठी हे पत्र म्हणजे त्यांची अंतिम निवड नसून उमेदवारांना अंतिम निवडीसंबंधी कोणताही दावा किंवा हक्क करता येणार नाही याची नोंद घ्यावी.
16) कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस येतांना उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास व अन्य खर्च दिला जाणार नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे